**स्पे. दि. मु. क्र. २६/२०१४**

रतन मेटल्स ..... **वादी**

**वि.**

यश इंटरप्राइझेस .... **प्रतिवादी**

## नि. ३९ वरील आदेश

१. प्रस्ततुचा अर्ज प्रतिवादी यांनी त्यांच्याविरुद्ध दि. १४/०७/२०१६ रोजी झालेला उलटतपास नाहीचा आदेश रद्द होवून मिळणेकामी दाखल केला आहे.

२. प्रस्तुत अर्जास वादींनी म्हणणे देवून अर्जास तीव्र विरोध केला आहे.

३. दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादींचे वकिलांचे निवेदन असे की, प्रकृती अस्वथामुळे प्रतिवादींचे वकिल न्यायालयात नेमलेल्या दिवशी हजर राहू शकले नाहीत व त्यामुळे त्यांना वादींचा उलटतपास घेणे शक्य झाले नाही. प्रस्तुत आदेश रद्द न झाल्यास प्रतिवादींचे मोठे नुकसान होणार आहे. त्यामुळे प्रस्तुत अर्ज मंजूर करावा. वादींचे वकिलांचे निवेदन असे की, प्रतिवादींनी प्रकरणाचे कामकाज लांबविणेच्या उद्देशाने उलटतपास घेणेकामी जाणून-बुजून विलंब केलेला आहे. वादींनी दि. ०२/०२/२०१५ रोजी सरतपासाचे शपथपत्र दिलेले आहे. यावरुन प्रतिवादींनी उलटतपास घेणेकामी अक्षम्य विलंब केल्याचे दिसून येते त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात यावा.

४. प्रस्तुत दाव्यात व सरतपासाच्या शपथपत्रात वादींनी प्रतिवादी यांचेविरुद्ध अनेक तक्रारी उपस्थित केलेल्या आहेत. त्या तक्रारींना उत्तर देण्याची व आपला बचाव मांडण्याची संधी प्रतिवादींना देणे गरजेचे आहे. याकामी वादींनी त्यांचे सरतपासाचे शपथपत्र दि. ०२/०२/२०१५ रोजी दाखल केले आहे. प्रतिवादींविरुद्ध उलटतपास नाहीचा आदेश दि. १४/०७/२०१६ रोजी पारित झालेला आहे. यावरुन असे दिसून येते की, प्रतिवादींनी उलटतपास घेणेकामी तब्बल दिड वर्षाचा विलंब केलेला आहे. प्रतिवादींविरुद्धचा उलटतपास नाहीचा आदेश रद्द केल्यास दाव्याचा गुणदोषावर निर्णय होण्यास मदत होणार आहे. परंतू प्रतिवादींना अशी संधी देत असताना त्यांनी केलेल्या विलंबाकरिता त्यांना खर्च बसविणे योग्य होणार आहे. त्यामुळे प्रस्तुत अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. म्हणून मी खालील आदेश देतो.

## <u>आदेश</u>

१. प्रतिवादी यांचेविरुद्ध दि. १४/०७/२०१६ रोजी झालेला उलटतपास नाहीचा आदेश रक्कम रु. ३००/- (रु. तीनशे मात्र ) खर्चादाखल वादींना देणेचे अटीवर रद्द केला आहे. (न्यायासनावर निवेदीत व अधिघोषीत केले)

कराड.
दि. ०७/०९/२०१६

**(प्र. अ. सवदीकर)**
दिवाणी न्यायाधीश व. स्तर, कराड

गणेश धों. जाधव,
लघलेखक (नि. श्रे.)